७९८

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय सां. वा.
दा. क्र. ७९८

# घडाभर अक्कल

BVBK-0400797
BVBK-0400797

# अनुक्रमणिका

७९८

घडाभर अक्कल

भगवान पाणिनी

खऱ्या कमाईची भाकरी

एक श्रीमान एक योगी

शाबास पीटर

आंधळे वाचू शकतात

लिलिपुटच्या राज्यातील खेळ

अशी तळमळ असे शिक्षण

जशास तसे

BVBK-0400797

# घडाभर अक्कल--




हत्तीचे पाऊल राखण्याची जबाबदारी बिरबलानें शेरखाना-पेक्षा चांगल्या रीतीने पार पाडून सरकारी खजिन्यात पंचवीस हजार रुपयांची भर घातली. त्यामुळे बादशहा खूष झाला आणि म्हणाला

"शाबास बिरबल! कमाल आहे तुझ्या अक्कल हुशारीच मला त्या हत्तीच्या पावलाची काहीच जरुरी नाही. त्यानिमित्तानं

मला शेरखानाची परीक्षा पहायची होती. आजपासून तुला पुन्हा वजीरपदी नेमण्यात येत आहे."

बिरबल पुन्हा वजीर झाला. कारभार पाहू लागला. औट घटकेच्या राजाप्रमाणे शेरखान काही काळच वजीरपदावर टिकला. एक दोनदा फजिती झाल्यामुळे शेरखानास पुन्हा वजीर करण्याची भुणभुण आता बेगमसाहिबा आपल्या मागे लावणार नाही असे बादशहास वाटले.

पण शेरखानचा स्वभावच विचित्र होता. शेरखानाची वजीरपद मागण्याची खोड अजून कायम होती त्याने पुन्हा प्रयत्न सुरू केले. आपल्या बहिणीच्या मागे सतत टुमणे लावणे हाच त्याचा प्रयत्न! भावावरच्या मायेमुळे बेगमसाहेबांनाहि वाटायचे, 'शेरखान एकदा दोनदा चुकला म्हणून काय झाले? माणूस हा चुकीला पात्र असतो चुकातूनच कधीकधी शहाणपण येते. शेरखानसुद्धा आता शहाणा झाला असेल. शहाणपणा काय एकट्या बिरबलालाच दिला आहे?'

बेगमसाहिबांनी हे विचार बादशहाजवळ बोलून दाखविले. ते बोलूनच त्या थांबल्या नाहीत तर त्यांनी शेरखानाला पुन्हा वजीरपदाची संधी देण्याबद्दल आग्रह धरला. बादशहाला शेरखानाची लायकी कळून चुकली होती. तरीसुद्धा बेगमसाहेबांनी जीव देण्याचा जेव्हा धाक घातला तेव्हा बादशहाचा नाईलाज झाला. शेरखानाच्या वजीरीच्या पायी बेगमसाहिबांनी खरोखरच जीव दिला तर काय घ्या.

बादशहा झाला तरी काय? स्त्रीहट्टापुढे काय चालणार? त्याची बिरबलावर मर्जी असूनसुद्धा स्त्रीहट्टामुळे त्याला बिरबलास बाजूला सारावे लागले.

बिरबल होता त्यामुळे अकबराच्या दरबारची चातुर्याबद्दल कीर्ती होती. बिरबल नसल्यामुळे आता अकबराच्या दरबारी शहाणपणा व चतुरपणा राहिला नसेल. अकबर दरबाराचा शहाणपणाचा झेंडा खाली आणायला ही संधी बरी आहे. अशा विचाराने तुर्कस्तान देशाच्या राजाने अकबर बादशहास एक पत्र पाठविले. त्या पत्रात लिहिले होते :–

## हिंदुस्थान देशाचे सम्राट,

शहेनशहा अकबर बादशहा यांस,

आपला दरबार अक्कलहुशारी आणि चातुर्य याबद्दल प्रसिद्ध आहे. एवढी अक्कल आमच्याकडे नाही. आपल्या दर..रात अकलेचे भरपूर पीक येतें हे ऐकून आम्हाला आनंद वाट खाना-
कृपा करून आम्हाला फक्त एक घडा भरून अक्क धीस
पाठवावी सध्या नसली तर चार महिन्यांनी पाठविली तरी चालेल. तसेच चार महिन्यांनी आपण जरएक घडाभरहि अक्कल पाठवू शकला नाहीत तर आम्ही असे समजू की, आपल्या दरबारातील सारी अक्कल संपली आहे.

कळावे.

अशा मजकुराचा लखोटा घेऊन आलेला तुर्कस्तानचा जासूद निघून गेल्यावर बादशहाने तो लखोटा नवीन वजीरसाहेब शेरखान याचे हातात देऊन म्हटले,

'तुर्कस्तानच्या बादशहाने मागितलेली वस्तू त्यानी दिलेल्या मुदतीत देऊन टाका, आणि पाठविलेली वस्तू अगदी शंभर नंबरी सोन्यासारखी असावी.'

शेरखानाने तो लखोटा वाचला आणि त्याला हूडहूडी भरली. तो थरथर कापू लागला. ज्याच्याजवळ अकलेचा एकहि थेंब नाही त्याने घागरभर अक्कल द्यावी कुठून ? शिवाय अक्कल ही काय उचलून द्यायची वस्तू आहे ? आमच्या देशातील रेशीम, सोने, हिरे असे भारी भारी पदार्थ जरी त्या तुर्कस्तानच्या बादशहानी मागितले असते तरी त्यांना एकच काय पण पाच-पन्नास घडे भरून दिले असते.

अक्कल ही कांही उचलून द्यायची वस्तू नाही. ती मागणाराने मोठ्या अक्कल हुशारीनेच मागितली आहे. आता देणाराने सुद्धा आपली अक्कल चालवून आणि आपली अक्कल शाबूत ठेवूनच ती दिली पाहिजे.

घडाभर अक्कल चार महिन्यात द्यायच्या या नव्या जबाबदारीने शेरखानाची झोप उडाली. त्याला कांही सुचेना. शेवटी आपल्या बहिणीच्या मध्यस्थीने त्यानी बिरबलाची गाठ घेतली. बिरबलाशिवाय या कामी कुणाचीच अक्कल चालणार

नाही याबद्दल त्यांचीसुद्धा खात्री होती. त्या लखोटयातील मजकूर वाचून बिरबल म्हणाला,

'बेगमसाहिबा ! आपल्या किंवा आपल्या भावाच्या अब्रू पेक्षा मला बादशहाच्या दरबारच्या अब्रूचे महत्त्व जास्त वाटते. दरबारची अब्रू संभाळण्यासाठी मी या लखोटयाला योग्य ते उत्तर देईन. आपण आता काळजी करू नका. हा बिरबल एकच काय पण लागतील तेवढे घडे भरून अक्कल देण्यास समर्थ आहे.

बिरबलाला एक युक्ती सुचली. तो आपल्या घराच्या परसदारी गेला. कुदळ खोऱ्यानी खांदून वाफे तयार केळे. त्यात पाणी घातलं आणि भोपळयाच्या बिया टोचल्या.

भोपळयाचे बी उगवून आले बिरबलाने त्याची चांगली काळजी घेतल्याने वेळ झपाटयाने वाढून त्यांना पिटुकले भोपळे लागले. मग बिरबलाने निमुळत्या तोंडाचे असे मातीचे चार घडे आणले.

बिरबलाने एकेका घडयात एकेक पिटुकला भोपळा वेलीवरच्या वेलीवर सोडून दिला. दिवसेदिवस भोपळे मोठे होऊ लागले. घडयातल्या घडयातच वाढत गेलेले ते भोपळे घडयाच्या तोंडापेक्षाहि मोठे झाले. घडयाएवढया आकाराचे गोल गरगरीत झाल्यावर बिरोचाने त्यांचे देठ तोडून घडे घरात आणले. प्रत्येक घडयातला एकेक भोपळा हेऽहे टम्म फुगलेला !

ते घडे त्याने दरबारात नेले आणि वजीर शेरखानास दिले. तसेच तुर्कस्तानच्या बादशहाकडे त्यातला एक घडा पाठवून पुढील मजकुराचें पत्र लिहिण्यास वजीराला सांगितले. पत्र असे होते.—

आपल्या मागणीवरून आणि आपण दिलेल्या मुदतीत आम्ही एक घडाभर अक्कल पाठविली आहे. ती आपण अलगद काढून घ्या आणि आमचा घडा न फोडता परत करा. एवढी अक्कल पुरली नाही तर कळवा आणखी तीन घडे तयार आहेत.

मांगकाम्या शेरखाननं बिरबलाच्या सांगण्याप्रमाणे केले. भोपळ्याने भरलेला एक घडा आणि लखोटा घेऊन जासूद तुर्कस्तानच्या बादशहाकडे गेला.

लखोटा वाचून आणि ती घडाभर अक्कल पाहून तुर्कस्तानचा बादशहा पोट दुखेपर्यंत हसला आणि म्हणाला,

"ही अक्कल शेरखानाची मुळीच नाही. हे तर त्या बिलंदर बिरबलाचेच चातुर्य आहे. आता आपण हा घडा न फोडता यातील ही अक्कल म्हणजेच भोपळा कसा काढावा? रिकामा घडा न फोडता परत मागितला आहे.

"आता आली का पंचाईत? "

असे म्हणून तुर्कस्तानचा बादशहा कपाळाला हात लावून बसला.

# भगवान पाणिनी--





फार फार वर्षापूर्वीची गोष्ट आहे. त्या काळी शाळा नव्हत्या. वह्या पुस्तके नव्हती. तरीपण शिक्षण देण्याचे व घेण्याचे कार्य चालूच होते.

मोठमोठे विद्वान् ऋषिमुनी त्याकाळी ज्ञान देत असत. त्यांचे आश्रम अरण्यात असत. ज्याला शिक्षण घ्यायचे असले असे विद्यार्थी त्यांच्या आश्रमात येऊन राहात तेथेच गुरुंची सेवा

करीत करीत ज्ञान घेत. तेथे सर्वच विद्यार्थी समान असत, उच्च नीच, गरीब–श्रीमंत असा भेद नसे.

त्या काळचे गुरुजी आश्रमातली साधी राहणी पत्करत तसेच त्यांच्या शिक्षण कार्यावर कुणाचे कडक बंधन नसे गुरुजींना याबाबतीत स्वतंत्र्य असे.

अशा त्या काळात पाणिनी नावाचे एक महान पंडित होते. त्यांचाही एक आश्रम होता. आश्रमाच्या सभोवताली रम्य अशी वनश्री होती. एका बाजूला उंच उंच अशी पर्वतशिखरे. दुसरीकडे झुळझुळ वाहणारा पाण्याचा प्रवाह सर्वत्र आंबा, फणस, नारळी, पोफळी, साग, देवदार, चंदन अशी कितीतरी प्रकारच्या लहान मोठ्या वृक्षांची गर्दी होती आश्रमात शिक्षणासाठी राहिलेल्या विद्यार्थ्यांनी वाढविलेली फुलबाग फुलांनी नेहमी बहरलेली असे. फळबागेत फुलांना तोटा नव्हता. शिवाय फुले, आश्रमवासी मंडळींना लागणारे धान्य, भाजीपाला त्याच जागी पिकवीला जाई.

आश्रमाच्या पुढे एक प्रचंड असा वटवृक्ष होता. त्या वटवृक्षाभोवती विस्तीर्ण असा एक पार होता. त्या पारावर, वडाच्या दाट सावलीत भगवान पाणिनी आपल्या विद्यार्थ्यांना ज्ञान देत बसलेले असत. विद्यार्थी गुंग होऊन ऐकत व ज्ञान घेत असत.

पाणिनी हे नुसतेच आचार्य नव्हते ते केवळ ज्ञान देणारे गुरुजी नव्हते. तर ते भाषाशास्त्राचे महान् पंडित होते. भाषेला

व्याकरणाचे नियम घालून देणारे पहिले विद्वान् पंडित म्हणजे पाणिनी !

व्याकरण म्हणजे तरी काय.? भाषा चांगली शुद्धपणे वापरण्याचे नियम ज्यात असतात त्याला व्याकरण म्हणतात पाणिनीनी आपल्या अंगाच्या हुशारीनें आणि तल्लख बुद्धी चालवून या भाषेला व्याकरणाचे नियम घालून दिले.

अक्षरे कशी निर्माण झाली ? शब्दाचे मूळ रूप कोणते ? शब्दाशब्दापासून वाक्य कसे बनले ? नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद, लिंग, वचन, काळ इत्यादि अनेक प्रकार निर्माण करून त्यांनी संस्कृत भाषेचे व्याकरण तयार केले.

संस्कृत भाषा ही सर्व भाषाची मूळ जननी भाषा आहे. आपली मराठी भाषा संस्कृतमधूनच निर्माण झाली आहे. मराठी भाषेला सुद्धा व्याकरण आहे. नाम, सर्वनाम, विशेषण,-क्रियापद यांची तुम्हाला आता माहिती झाली असेलच या शिवाय लिंग, वचन, तीन काळ यांचीही माहिती तुम्हाला होईलच. तसेच वाक्य लिहीताना जागजागी कांही थांबण्याच्या खुणा असतात. त्यांना विरामचिन्हे म्हणतात. यांचीहि माहितो तुम्ही शिकणार आहात.

संस्कृत प्रमाणे मराठी भाषेचे सुबोध व्याकरण तयार करण्यात आले. हे काम दादोबा पांगुरंग या विद्वान् गृहस्थानी केले. म्हणून त्यांना मराठी भाषेचे पाणिनी असेहि म्हणतात.

'शुद्ध कसे बोलावे व शुद्ध कसे लिहावे हे व्याकरण शिकल्याने समजते' असे हे पांडुरंग दादोबा म्हणतात.

गुरुवर्य पाणिनी आपल्या विद्यार्थ्यांनाही व्याकरणाचे पाठ देत. एकेक शब्दावर तासन् तास बोलत. तो शब्द कसा तयार झाला हे मुलांना पटवून देत.

एकदा अशीच पौर्णिमेची रात्र होती. गुरुजींनी भल्या पहाटेच सर्व शिष्यांना उठविले. सर्वांनी गुरुच्या आज्ञे प्रमाणे आपापली अंथरुणे गुंडाळलीं. आळशीपणाने अंथरुणावर लोळत कुणीच राहिले नाही. कारण त्याना गुरुजींची आज्ञा पाळणे एवढेच ठाऊक होते. तसच त्यांना ज्ञान घेण्याची तळमळ होती. त्यामुळे गुरुजींनी कितीहि जागविले तरी जागत व केंव्हाहि उठविले तरी ते कुरकुर न करत उठत.

गुरुजींनी उठवताच सर्वजण उठून प्रातर्विधी उरकून आले. गुरुजींनी आपले आसन टाकलेच त्यावर ते बसले. शिष्यगण त्यांच्यापुढे बसला. गुरुजी त्यांना शिकवू लागल. विद्यार्थी मन लावून ऐकू लागले.

आज गुरुजींनी व्याकरण हा विषय शिकवण्यास घेतला होता. ते एखादा शब्द घेत व तो कसा निर्माण झाला याची आपल्या रसाळ भाषेत माहिती देत. गुरुवर्य पाणिनींच्या चेहऱ्यावर त्यांच्या विद्येचे तेज झळकत होते. पौर्णिमेच्या स्वच्छ अशा चंद्र प्रकाशात गुरुजींची तेजस्वी मूर्ति उजळून दिसत होती.

शिष्यवर्ग त्यांच्या त्या तेजस्वी मूर्तीने व अगाध ज्ञानाने प्रभावित झाला होता. त्यांच्या मुखातून ओघणारी भाषा विद्यार्थ्यांचे चित्त आकर्षित करीत होती.

गुरुजी शिकविण्यात गुंग झाले. ते आजूबाजूच्या वातावरणालाही विसरून गेले होते. 'वाघ' हा शब्द कसा निर्माण झाला याची माहिती ते शिष्यांना देत होते. इतक्यात् एका विद्यार्थ्याला दूरवर दोन डोळे चमकताना दिसले. ते भयंकर डोळे हळू हळू पुढे येऊ लागले. त्याने दुसऱ्या मुलाला ते दाखविले. दुसऱ्याने तिसऱ्याने-चौथ्याला असे करीत करीत सर्वांना चमकणारे भयंकर डोळे दिसले.

ते डोळे अगदी जवळ आले. 'बापरे ! हा तर वाघ !'

'वाघ ! वाघ ! पळा पळा'

असे म्हणत सर्वजण उठले. पळाले. पण आपले महर्षि पाणिनी उठले नाहीत. त्यांना हा गोंधळ कांहीच समजला नाही. ते आपले डोळे झाकून बोलत होते. गुंग होऊन शिकवीत होते.

'बरंका विद्यार्थ्यांनो ! वाघ हा असा निर्माण झाला. 'व्या जिघ्रति स व्याघ्र:' वास घेत येतो त्याला वाघ म्हणतात.'

गुरुजींचा 'वाघ' हा शब्द ऐकायला शिष्य होतेच कुठे ? खऱ्याखुऱ्या वाघाला पाहून ते केंव्हाच पसार झाले होते. मरणाच्या भीतीने ते पळाले होते, गुरुजींना मरणाचे भय नव्हते. त्यांनी

वाघाची माहिती जशी सांगितली तसाच तो वाघ माणसाचा वास घेत घेत त्यांच्याकडे आला. डरकाळ्या फोडू लागला. तरी त्यांची ज्ञानसमाधि उतरली नाही. विद्यार्थी आपल्या पुढेच आहेत अशा समजुतीने गुरुजी बोलत होते.

'वाघाला मनुष्य भितो. पण वाघाचे ज्ञान नाही. ज्ञान अमर असते.

गुरुवर्य पाणिनी असे बोलत आहेत तोच वाघाने त्यांच्यावर झडप घातली. त्यांनी त्याच क्षणी परमेश्वराला हात जोडले. पाणिनीना वाघाने खाऊन टाकले. पण त्याच जागी त्यांची हाडे सुद्धा पडली नव्हती. वाघाच्या रूपाने येऊन परमेश्वरानेच पाणिनीचा देह नेला. परमेश्वराने त्यांची परीक्षा पाहिली. पण ते त्या परीक्षेला उतरले. वाघ शब्दाची माहिती सांगताना खऱ्याखुऱ्या वाघाला ते भ्याले नाहीत. पाणिनी अमर झाले. भगवंताच्या चरणी विलीन झाले.

तेव्हापासून लोक त्यांना भगवान पाणिनी म्हणू लागले.

# खऱ्या कमाईची भाकरी--



शीख धर्माचे संस्थापक गुरु नानक याची ही गोष्ट आहे. नानक हे दयाळू होतें. तसेच त्यांना चांगल्या वाईट गोष्टीचे खूप ज्ञान होते.

नानकांच्या लहानपणची ही एक छोटीशी गोष्ट आहे. ती वाचल्यावरच त्यांचे थोरपण कळून येईल.

एकदा नानकांच्या वडिलांनी त्यांना धंद्यासाठी भांडवल म्हणून पैसे दिले आणि म्हटले,

"हे पैसे घेऊन तू एखादा छोटासा पण छानसा धंदा कर. चांगला फायदा होईल असा व्यापार कर."

नानकाने ते पैसे घेतलें आणि व्यापार करण्यासाठी तो लाहोर शहराकडे निघाला.

वाटेत एक गाव लागले. तेथे धर्मशाळेत तो थांबला. त्या धर्मशाळेत बरेच साधू बैरागीही उतरले होते त्यांच्याशी बोलता बोलता नानकाला समजले कीं, ते साधू बरेच दिवस झाले उपाशी आहेत. त्यांना कुठे भिक्षा मिळाली नाही.

हे ऐकून नानकाला दया आली. त्याने मनाशी विचार केला, आपल्या जवळचे पैसे खर्च करून जर या भुकेलेल्या साधूंना जेवण दिले तर काय हरकत आहे? वडिलांनी आपणास चांगला फायद्याचा व्यापार करण्यास सांगितले आहे.

भुकेलेल्या साधूसंतांना अन्नदान करणे यापेक्षा अधिक फायदा कोणत्या व्यापारात आहे. हाच खरा फायदा आणि हाच खरा व्यापार!

असा विचार करून नानक बाजारात गेला. त्याने अन्नधान्य व इतर स्वयंपाकाचे साहित्य आणले आणि छानसा स्वयंपाक

करून सर्व साधूसंताना पोटभर जेवण घालून सर्व पैसे संपविले. संतांचा आशिर्वाद घेऊन तो घरी परतला.

हाच नानक पुढे शीख धर्माचा प्रसार करीत व लोकांना उपदेश करीत फिरू लागला. लोक त्याला गुरु नानक म्हणू लागले.

गुरु नानक एकदा असेच फिरत फिरत अमीनाबाद येथे आले. त्या गावात 'लालो' या नावाचा एक सुतार राहात होता. तो सुतार गुरु नानकाचा भक्त होता. तो त्यांचा उपदेश मानत होता.

सर्वांचा परमेश्वर एक आहे. सर्वांनी मनोभावे त्याची भक्ती करावी. दीन दुबळ्यांना मदत करावी. भुकेलेल्यांना अन्न द्यावें. कशाचा लोभ करू नये. कष्टाची भाकरी हीच खरी कमाई. कुणी कुणाला लुबाडून कमाई करू नये. असा गुरु नानकांचा उपदेश असे.

लालो सुतार हा त्यांच्या उपदेशाप्रमाणे वागत होता. गुरु नानक त्याच्या घरी राहिले. त्याच्याकडे जेवले. त्यामुळे गावातील लोक म्हणू लागले,

'नानकांनी लालोसारख्या हलक्या जातीच्या, व गरीब माणसाच्या घरी जेवण घेतले. त्यामुळे ते भ्रष्ट झाले. नानक बाटले.'

पण नानकांनी लोकांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले. ते स्वत: जातीभेद मानत नव्हते.

त्या गावात 'मलक' या नावाचा एक श्रीमंत राहात होता. त्याने गुरु नानकांना आपल्याकडे जेवणाचे आमंत्रण दिले. पण नानकांनी तेथे जेवायला जायचें टाळले. नानक आपल्याकडे जेवणास आले नाहीत याचा मलकास राग आला. नानक लालो-सारख्या दरिद्री सुताराच्या घरी जेवतो आणि मी एवढा मोठा सावकार असून माझ्याकडे जेवणास येत नाही? त्याची खोड मोडली पाहिजे. असा विचार करून मलकाने नानकास बोलावून घेतले आणि विचारले,

"लालो सुताराकडचें जेवण तुला चालते आणि माझ्या-सारख्या श्रेष्ठ आणि श्रीमंताकडचे जेवण तुला का नको वाटते?'

नानकाने येताना लालोच्या घरची एक भाकरी आणली होती. मलक सावकारालाहि त्याने एक भाकरी मागितली. मलकाने त्याला भाकरी दिली.

नानकाने एका हाताने लालो सुताराची भाकरी दाबली आणि दुसऱ्या हाताने मलक सावकाराची भाकरी दाबली, आणि मोठा चमत्कार करून दाखविला.

लालोची भाकरी दाबताच तिच्यातून दूध निघू लागले आणि मलकाची भाकरी दाबताच तिच्यातून रक्ताचे थेंब पडू लागले,

गुरु नानक म्हणाले,

"लालोची भाकरी ही स्वतःच्या कष्टावर मिळविलेल्या कमाईची आहे. ती कमाई पवित्र आहे. अशा कमाईचेच अन्न मला गोड लागते.

मलकाची कमाई कष्टाची नाही. लोकांना लुबाडून मिळविलेली ती कमाई असल्याने ती अपवित्र आहे. असे अन्न मला गोड लागत नाही."

म. ग्र. म, ठाणे,
क्र. २९८
विषय किशोर २९४

# एक श्रीमान् एक योगी-

श्रीमान् छत्रपति शिवाजी महाराज हे नुसते राजेच नव्हते तर तें राजयोगी होतें. त्यांच्या अंगी शौर्य, धैर्य, पराक्रम, मुत्सद्दीपणा हे जेवढे प्रभावी होते तेंवढेच ते विनयशील, उदार व त्यागी वृत्तीचें होते.

शत्रूशी वागताना ते जेवढे कडक होते त्याहून प्रेमळपणा मित्रांशी वागताना दाखवीत. अफजलखानाला ठार करणारे, शाहिस्तेखानावर बेधडक वार करणारे शिवराय आपलें मित्र बाजीप्रभू, तानाजी हे वारले तेव्हा ढसढसा रडले.

रणांगणात शत्रूला सळो की पळो करणारे शिवराय देवापुढे, वडिल मंडळींपुढे व संतांपुढे आदराने वागत. त्यांना ते मान देत. देवधर्म, साधूसंत आणि गोर-गरीब यांना ते उदारपणाने दानधर्म करीत.

अशा या राजयोगी श्रीमान् छत्रपतीच्या दानशूरपणाची ही गोष्ट आहे. दान देणारा आणि दान घेणारा हे दोघेहि महापुरुष असल्यानंतर काय घडते ते या गोष्टीत दिसून येते.

श्रीमान् छत्रपतींचा मुक्काम काही कामानिमित्त साताऱ्यास होता. तेथेहि त्यांचा भव्य असा राजवाडा होता. त्या राजवाड्यावर जरिपटका डौलाने फडकत होता. शिवाजी राजांचा मुक्काम त्या

राजवाड्यात असल्याची ती खूण होती. शिवाय वाड्याच्या दरवाजावर दोन मावळे तलवारी घेऊन पहारा करीत होते.

समर्थ रामदास स्वामींना शिवाजी राजे फार मान देत. ते त्यांना गुरु मानत. समर्थ त्यावेळी माहुलीला होते. राजांचा मुक्काम साताऱ्याला आहे असे समजताच समर्थ त्यांच्या भेटीसाठी साताऱ्यास आले. स्वराज्याच्या कामात समर्थ रामदास हे शिवाजी महाराजांना मोलाचा सल्ला देत. धर्म आणि राजकारण या बाबतीत योग्य असा उपदेश करीत. असाच मोलाचा उपदेश करण्यासाठीं ते साताऱ्यास महाराजांकडे आले.

समर्थ रामदास भिक्षा वृत्तीने राहात होते.

'जय जय रघुवीर समर्थ' असा खड्या आवाजात प्रभु रामचंद्राचा जयजयकार करून ते दारात उभे राहिले की त्या घरातील माणसे त्यांच्या झोळीत भरपूर धान्य घालीत. रामदासांचे सर्व शिष्य अशीच भिक्षा मागून आणत.

चार घरे भिक्षा मागावी. प्रपंचाचा मोह धरू नये रामनाम घेत राहावे आणि नेहमी सत्कार्य करावे असे रामदासांचे विचार होते. त्यांना कशाचा लोभ नव्हता. घर-दार, पैसा अडका, दागदागिने अशा कोणत्याच मोहात ते पडत नव्हते

साताऱ्यास आल्यानंतर समर्थांनी छत्रपति शिवाजी राजांच्या राजवाड्यापुढे उभे राहून खड्या आवाजात गर्जना केली, 'जय जय रघुवीर समर्थ'

दरवाजावरील शिपायांनी समर्थांना लवून नमस्कार केला आणि वाड्याच्या चौकात नेले. तेथे पुन्हा रामदासांनी घोषणा केली. समर्थांचा आवाज ऐकताच शिवाजी राजे आपल्या जागेवरुन उठले, आणि नमस्कार करण्यासाठी निघाले. इतक्यात त्यांना कांहीसे आठवले. आणि ते परत आपल्या जागेवर गेले. एका कागदावर कांहीतरी लिहू लागले.

रामदास स्वामींना आश्चर्य वाटले. शिवाजी आज दर्शनाला येता येता माघारी फिरून का गेला ? ते पायऱ्या चढून वर जाऊ लागले. त्यांच्या पायातील खडावांचा खाड खाड असा आवाज येत होता. एका हातात कुबडी. एका हातात कमंडलु, काखेत झोळी, अंगात भगवी वस्त्रे, गळ्यात माळा, अशा वेशातले रामदास स्वामी पायऱ्या चढून थेट महाराजांपुढे येऊन उभे राहिले.

शिवाजी महाराजांनी एवढ्या वेळात त्या कागदावर दोन ओळी लिहिल्या होत्या. तो कागदच भिक्षा म्हणून त्यांनी समर्थांच्या झोळीत टाकला आणि त्यांना वंदन केले.

शिवबानी घातलेली ती विचित्र भिक्षा पाहून समर्थांना नवल वाटले. त्यांनी तो कागद काढून वाचला, त्यावर शिवाजी राजानी लिहिले होते,

'गुरुवर्य रामदास स्वामीजी ! आपणासारख्या थोर पुरुषास साजेशी भिक्षा मी माझ्या ऐपतीनुसार घालत आहे ! माझे सारे राज्य आज मी आपल्या चरणी दान करीत आहे!

आपला नम्र सेवक
शिवाजीराजे भोसले

तो मजकूर वाचून समर्थ म्हणाले,

'शिवबा ! तू हे काय केलेस ! अरे ! माझ्या सारख्या सर्वस्वाचा त्याग करुन संन्यासी झालेल्या माणसास तुझे राज्य घेऊन काय उपयोग ? '

त्यावर शिवबांनी उत्तर दिले,–

'स्वामीजी हे सारे राज्य मी आपल्या आशिर्वादावर मिळविले आहे. हे सारे आपणास अर्पण करु नको तर कुणाला करू ? '

'नाही शिवबा ! तूच या राज्याचा राजा आहेस राजाने आपले राज्य चांगले चालवावे हा त्याचा धर्म आहे. तू हे राज्य उत्तम रीतीने चालव. माझा आशिर्वाद आहे ! '

समर्थांच्या या उपदेशावर शिवबा म्हणाले,

'स्वामीजी ! एकदा दान म्हणून दिलेले राज्य मी परत कसे घेऊ ? तो धर्म नाही. आता आपणच या राज्याचे स्वामी; आणि मी आपला सेवक ! '

असे म्हणून शिवबानी समर्थांच्या पायावर डोके ठेवले. समर्थांनी त्यांना उठवीत म्हटले,

'ऊठ शिवबा ! तू जरी दिलेले दान परत घेऊ शकत

नसलास तरी, मीही संन्यासी असल्याने हे दान घेऊ शकत नाही. संन्याशाने आपला धर्म संभाळला पाहिजे ! '

केवढा थोर विचार ! किती विचित्र प्रसंग ! एका श्रीमान् राजयोग्याने राज्य दान केले आणि ते दान ज्याला केले तो योगी महापुरुष ते दान नाकारत आहे. आयते राज्य झोळीत पडल्यावर कोणीं सोडील का ? पण थोर पुरुषांचें सारे कांही वेगळेच असते. त्यांचे विचार थोर असतात तसेच आचारहि थोर असतात.

शेवटी या थोर पुरुषाने मार्ग काढला आणि शिवबानी दान केलेले राज्य त्यांनी आपला प्रसाद म्हणून शिवबास परत दिले.

शिवाजी महाराजांनीही समर्थांचा प्रसाद म्हणून राज्य चालविले. समर्थ रामदासांची खूण म्हणून त्यांनी आपल्या हिंदवी स्वराज्याचें निशाण समर्थांच्या कफनीसारखे भगव्या रंगाचे केले.

तेव्हापासून मराठी राज्याचें निशाण भगवे झाले. या भगव्या ध्वजाने इतिहासात अनेक विजय मिळविले.

# शाबास पीटर -



हालंड या नावाचा एक छोटासा देश आहे. या देशाच्या भोवताली समुद्र आहे. तरी पण गंमत अशी की या देशाची जमीन समुद्रसमपटीपेक्षा उंच नाही. समुद्राच्या पाण्याची जी सपाटी आहे त्याहून या देशाची भूमि थोडी खोलगटच आहे.

पाण्याचा गुणधर्म काय आहे बरे? ते उंच भागाकडे वाहते की खोलगट भागाकडे वाहते ?

अर्थातच पाणी आपल्या गुणधर्मानुसार नेहमी खोलगट भागाकडे किंवा उताराकडे वाहात राहाणार. हॉलंडच्या जमिनीपेक्षा त्याच्या भोवतालचा समुद्रच अधिक उंच असल्याने त्या समुद्राचे पाणी या जमिनीवर येण्याचा सतत प्रयत्न करीत असते.

मग तुम्ही म्हणाल, ' तिथं जमीन राहीलच कशी ? ती ताबडतोब जलमय होऊन जाईल. '

तुमचे म्हणणे बरोबर आहे. तरीपण समुद्राच्याच जवळ पण समुद्रसपाटीहून खोलगट असा हा देश कधीकाळी निर्माण झाला आहे एवढे खरे. तसेच हा देश निर्माण झाला तेव्हाच याच्या संरक्षणासाठी सभोवताली भक्कम असा तट बांधला आहे.

समुद्राच्या किनाऱ्यावर बांधलेल्या या भक्कम तटबंदीमुळे समुद्राचे पाणी कडेच्या गावात येऊ शकत नाही. खंबीर आणि दणकट अशा या दगडी तटावर समुद्राच्या प्रचंड लाटा येऊन आदळतात आणि परत जातात. समुद्र कितीहि खवळला आणि हत्तीएवढ्या मोठ्या लाटा उसळू लागल्या तरी या दगडी तट भिंतीपुढे त्याचें काही चालत नाही. हॉलंडच्या सभोवती असलेला हा प्रचंड धक्का समुद्राच्या प्रचंड लाटांचे धक्के वर्षानुवर्षे खात आहे. त्याच्यायोगेच तो देश सुरक्षित राहिला आहे.

अशा या देशातील एका लहान मुलाची ही गोष्ट आहे. तो मुलगा फार कांही मोठा नव्हता. असेल फार तर तुमच्या एवढाच. तो खेळकर होता तसाच हुशार आणि धोरणीहि होता.

त्या मुलाचे गाव समुद्राच्या कडेलाच होतें. अर्थातच त्याच्या गावाजवळ समुद्रकिनाऱ्यावर भला मोठा दगडी तट होता. त्या तटापलिकडे अथांग पसरलेला समुद्र गर्जत होता. उसळ्या मारीत होता. आपल्या भयंकर लाटांचे धक्के त्या दगडी धक्क्यावर मारत होता. त्या गावातील लोकांना त्या समुद्राच्या गर्जनेची संवय झाली होती. लहान मुलेसुद्धा न भिता त्या धक्क्यांच्या कडेने खेळत.

तो मुलगा असाच एकदा त्या धक्क्याजवळ खेळत होता. खेळता खेळता तो एकदम थबकला. त्याला जे दिसले त्यामुळे तो प्रथम घाबरला. काय करावे हे त्याला सूचेना.

तो जेथे खेळत होता तेथेच त्या दगडी तटभितीला एक लहानसे छिद्र पडले होते आणि त्यातून समुद्राचे पाणी हळू हळू आत शिरत होतें. मुलगा विचारात पडला. बघता बघता ते छिद्र मोठे होऊन जास्तच पाणी येऊ लागलें. असेच जर हे चालले तर या भितीला भलें मोठे खिडार पडायला वेळ लागणार नाही. आणि मग ?

तो मुलगा गोंधळात पडला. संध्याकाळची वेळ असल्याने त्या बाजूला सारा शुकशुकाट होता. मुलाला मदत करायलासुद्धा कुणी नव्हते. शेवटी त्याने एकट्यानेच ते छिद्र बुजवायचे ठरविले. त्याने चिखल कालवला आणि कामाला सुरुवात केली. पण पाण्याचा जोर जास्त असल्याने चिखल टिकेना. त्या दिवशी पौर्णिमा होती. पौर्णिमेला समुद्राला खूप मोठी भरती येत असते.

त्यामुळे समुद्रात मोठमोठ्या लाटा उसळून त्या किनाऱ्यावर आदळतात. पौर्णिमेच्या भरतीमुळे तर त्याला ते भगदाड बुजविता येईना.

तो घाबरुन गेला. रात्री तर समुद्राला फारच भरती येणार. आणि हे खिडार वाढत जाऊन जर का पाणी आत शिरू लागले तर उद्या सकाळपर्यंत सारा गाव समुद्रात बुडून जाईल.

गावाला या संकटातून वाचविण्यासाठी आपण कांहीतरी केले पाहिजे असे त्याला वाटू लागले. शेवटी त्याला एक नामी युक्ती सुचली.

त्याने आपला चिमुकला हातच त्या खिडारात घातला. त्यायोगे पाणी आत यायचे थाबले त्या छोट्याला आनंद झाला. रात्र झाली तरी तो तेथून हालला नाही. आणि त्याच्या मदतीलाही कुणी भेटले नाही. रात्रभर समुद्र गर्जत होता. तरी तो भ्याला नाही. तो तसाच तेथे आपला हात अडकावून रात्रभर बसून राहिला.

त्याच्या आई-वडिलांनी त्याचा खूप शोध केला पण तो सापडला नाही. या धक्क्याच्या बाजूला तो असेल असे त्यांना वाटले नाही. ते रात्रभर आपल्या मुलाची काळजी करीत होते.


पहाट झाली. एका गुराख्याच्या मुलाला तो दिसला. रात्रभर दमून भागून आणि थंडीने कुडकुडून तो पहाटे पहाटे झोपी गेला होता. त्या गुराख्याने गावातील माणसे जमविली.

गावकऱ्यांनी त्या मुलास बाजूला काढून ते भगदाड बुजविले. ते पाहून तो दमलेला व थकलेला मुलगा आनंदित झाला. गावावरचे संकट आपण टाळू शकलो याचे त्याला समाधान वाटले.

या कामगिरीबद्दल सर्वांनी त्याचे कौतुक केले व मोठे बक्षीस दिले अशा त्या धोरणी व शूर मुलाचे नाव होते पीटर उर्फ हॅंस !

हॉलंडमधील या पीटरची गोष्ट वाचून तुम्हाला आपल्या देशातील आरुणीची आठवण झाली ना?

# आंधळे वाचू शकतात-



आंधळ्या लोकांना दृष्टी नसते. त्यांना हे जग कसे आहे ते पहावयास मिळत नाही. पण पुस्तके वाचून मात्र त्यांना जगाचे ज्ञान मिळते.

आंधळे लोक पुस्तके वाचतात ही गोष्ट आता फारशी नवलाची राहिली नाही. मोठमोठ्या शहरातून अंधशाळा असतात. त्या शाळेत अंध लोकांना शिक्षण दिले जाते. अंध लोकांसाठीच

खास तयार केलेली पुस्तके वाचावयास शिकविली जातात. ही पुस्तके आपल्यासारख्या डोळ्यांनी वाचायची नसतात. हातांनी स्पर्श करून त्या पुस्तकातील मजकूर अंधांना वाचता येतो.

खास अंध लोकांसाठी एक लिपि बनविली आहे. ती लिपि प्रथम त्यांना शिकविली जाते. ती हाताने लिहिलेली असून हातानेच वाचावयाची असते. त्या लिपीस ब्रेल लिपी म्हणतात.

ब्रेल लिपीचा शोध 'लुई ब्रेल' याने लावला. त्याच्या ब्रेल या नावावरूनच त्या लिपीला ब्रेल लिपी असे नाव पडले. या लिपीचा शोध सुमारे सव्वाशे वर्षांपूर्वी लागला. त्यापूर्वी अंध लोकांना जगाचे ज्ञान होण्याचे कोणतेच साधन नव्हते. बिचारे आंधळे लोक खरोखरच अज्ञानाच्या अंधारात चाचपडत होते.

अंधांना ज्ञानदृष्टी देणाऱ्या लुई ब्रेल या संशोधकाचीहि दृष्टी गेली होती, तोहि एक अंध होता. त्याचीच ही गोष्ट !

लुई ब्रेल याचा जन्म फ्रान्स देशात झाला. तो सात आठ वर्षांचा असतानाची गोष्ट आहे. हातात टोकदार असे दाभण घेऊन एकदा तो जोराने पळत चालला होता. पळता पळता तो अडखळून पडला. आणि दुर्दैवाने त्याच्या डोळ्यात ते दाभण घुसले. त्यामुळे त्याची दृष्टी गेली.

त्याच्या वडिलांनी खूप इलाज केले. पण व्यर्थ ! मुलाची दृष्टी गेली ती गेलीच. त्याला शिक्षणाची फार आवड होती.

त्याकाळी अंधशाळा फार थोड्या होत्या. आणि या शाळेतील शिक्षणहि अवघड होते.

लुई ब्रेल हा शिक्षणासाठी व ज्ञान मिळविण्यासाठी धडपडू लागला. त्याच्या वडिलांनी त्याला एका अंधशाळेत दाखल केले. त्या अंधशाळेत प्रथम तो वर्णमाला शिकला. त्या वर्णमालेची लिहिण्याची पद्धत विचित्र होती.

झाडांच्या काटक्यानी ती अक्षरे बनविलेली होती. एकेका अक्षराला आठ सेंटिमीटर लांब आणि पाच सेंटिमीटर रुंद एवढी जागा लागत असे. त्यामुळे अशा पुस्तकांचा आकार खूप मोठा व जाड असे. अर्थातच त्यांचे वजनहि खूप असे. त्याकाळी एक गोष्टीचे पुस्तक होते. त्या पुस्तकाचे आठ भाग होते आणि एकेका भागाचे वचन सुमारे पाचशे ग्रॅम होते. यावरून कल्पना नेईल की अंधासाठी पुस्तके तयार करणे किती अवघड आणि जिकीरीचे काम होते.

ब्रेल हा हुशार आणि चौकस बुद्धीचा मुलगा होता. अंधाची ही अवघड पुस्तके वजनात लहान लहान व्हावीत. सर्व अंधाना ती सहज वागविता यावीत. तसेच त्यांना सहज समजतील अशी अक्षरे त्यात असावीत. लिहीताना सुद्धा त्यांना फार कष्ट पडू नयेत असे ब्रेल याला वाटत होते. त्यासाठी तो प्रयत्न करीत होता.

ब्रेलने विचार केला. ही अक्षरे म्हणजे तरी काय आहे ? तोंडातून निघणाऱ्या आवाजाच्या आणि निरनिराळ्या ध्वनीच्या

खुणाच नाहीत का ? तोंडातुन 'ख' हा आवाज निघाला, तो आवाज लिहीण्याची खूण म्हणून आपण 'ख' हे अक्षर काढतो मग अशाच कांही खुणा तयार करून खास अंध लोकासाठी अक्षरे तयार केली तर सर्व अंधांची अडचण दूर होऊन त्याना ज्ञान मिळविणे सोपे होईल.

जोराने टाईप केल्यामुळे कागदावर उठावदार अक्षरे उमटलेला एक कागद एकदा ब्रेलच्या हाती आला. त्यावरील अक्षरे ब्रेलने केवळ हातानी चाचपटून वाचली. अशीच उठावदार अक्षरे कागदावर काढली तर अंध लोकाची पुस्तके सुटसुटीत होतील. वाचायलाहि येईल आणि ज्ञान मिळविणे सोपेहि होईल. आता फक्त ती अक्षरे लिहायला सोपी अशी करणे एवढे काम केले की अंधांची अडचण कायमची दूर होईल.

फ्रान्सच्या सैन्यात एक गुप्त लिपि होती. त्या लिपीचा अर्थ फ्रेंच सैन्याशिवाय कुणालाच समजत नव्हता. ती लिपी फक्त टिंबा आणि रेषा यानीच बनविलेली होती.

ब्रेलने फ्रेंच सैन्याच्या अधिकाऱ्याला विनंती करुन त्या लिपीची माहिती घेतली आणि चार पाच वर्षे रात्रंदिवस प्रयत्न करुन अंधांसाठी एक सोपी आणि समजण्याजोगी लिपी तयार केली. टिंबा आणि रेषाचीं ही लिपी लिहीण्यासाठी त्याने दाभणाचाद वापर केला.

कितीं विचित्र योगायोग आहे पहा ! लहानपणी याच ब्रेलची दृष्टी एका दाभणानेच घालविली आणि आता ब्रेलने आपल्या अंध बांधवाना दृष्टीदान करण्यासाठी जी लिपी काढली त्या लिपीलासुद्धा दाभणच उपयोगी पडले.

केवळ स्पर्शाने वाचता येणारी ६३ अक्षरे या लिपीत असून त्या ब्रेल लिपीमुळे आज हजारो अंध डोळे नसून सुद्धा जगाचे ज्ञान मिळवीत आहेत. धन्य तो अंध ब्रेल त्याने अंधानाही नवी दृष्टी दिली !

# लिलिपुटच्या राज्यातील खेळ



बुटक्या लोकांच्या लिलिपुट राज्यात गालिव्हर हा एक कौतुकाचा विषय बनला होता सर्व ठेंगू लोकांना त्याचे कुतुहल वाटत होते. त्याला पाहण्यासाठी ठेंगूंची गर्दी वाढत होती.

टोळक्या टोळक्यानी ते ठेंगू लोक गलिव्हरकडे येत होते. त्यांच्या हातात धनुष्य बाण असत. त्यातील कांही लोक समंजस होते तर कांही खोडकर होते. एकाने तर गलिव्हरच्या डोळ्या-

वरच बाण सोडला. त्याचा नेम थोडक्यात चुकला म्हणून बरे ; नाहीतर गलिव्हरचा डोळाच फुटलाच असता.

गलिव्हरच्या भोवती सरकारी पहारेकरी होते. तेहि या गर्दीला वैतागले होते. त्या पहारेकऱ्यांनी अशा चारपाच खट्याळ लोकांना गलिव्हरच्या अंगावर ढकलले. गलिव्हरनें त्यातल्या तीन चार जणांना आपल्या मुठीत पकडले आणि खिशात टाकले. अशी पंचवीस माणसे मावतील एवढा त्याचा खिसा मोठा होता.

गलिव्हरने त्या जमावातील एकाला आपल्या मुठीत पकडून तोंडाजवळ नेले आणि 'आ' केले. त्याबरोबर तो ठेंगू घाबरून मोठ्याने किंचाळला. त्याचे ओरडणे ऐकताच बाकीचे पळू लागले. त्यांच्या त्या पळापळीत लहान लहान मुले चेंगरली.

नंतर गलिव्हरने त्याला सोडून दिले. खिशातल्या ठेंगूंनाही त्याने बाहेर काढले व सोडून दिले. त्यामुळे त्याच्या दयाळूपणा-बद्दल बुटक्यांची खात्री झाली.

लिलिपुटच्या ठेंगू लोकांनी गलिव्हरचें नाव 'पर्वतराव' असे ठेवले होते. लिलिपुटच्या राजाच्या हुकुमावरून गलिव्हर उर्फ पर्वतराव याच्या सर्व खिशाची झडती घेतली व पुढीलप्रमाणे अहवाल तयार केला.

१) पर्वतरावाच्या खिशात एक भला मोठा व जाड असा कापडाचा तुकडा सापडला. त्याचा आकार चौरस असावा.

२) एका खिशात एक भली मोठी चांदीची पेटी होती. ती खूप जड होती. पर्वतरावाने ती उघडून दाखविली. त्या पेटीत कसलीशी भुकटी होती. आम्ही तिची तपासणी करायला गेलो तर फटाफट शिंका येऊ लागल्या. ती भुकटी नाकात गेल्याने सर्वजण शिंकून शिंकून हैराण झालो.

३) दुसऱ्या एका खिशात उंच आणि टोकदार अशा दातऱ्या दातऱ्याचा पदार्थ होता. तो पदार्थ पर्वतरावाने आपल्या केसावरून फिरवून केस व्यवस्तित करून दाखविले.

एका खिशात तांबडे, पांढरे, पिवळे असे धातूचे तुकडे आढळले. पर्वतरावच्या देशातील ती नाणी असावीत. ती नाणी आम्हाला उचलतसुद्धा नव्हती.

५) त्याच्या आणखी एका खिशात गोल आणि चकचकीत अशीं वस्तू सापडली. तिच्यावर आकडे व काटे होते. ती वस्तू 'ठकठक' असा आवाज करीत होती.

६) सोन्याचे तुकडेहि त्याच्याजवळ सापडले

७) त्याच्या कमरेस एक तलवार आणि लोखंडी नळीची जाड अशी वस्तू आढळली.

ती लोखंडी नळीची वस्तू काय आहे हे विचारताच त्याने ठो! ठो! ठो! असें बार काढले. तपासणी करणारे कित्येक सैनिक त्या आवाजाने बेशुद्ध पडले.

अशा रीतीने गलिव्हरची झडती घेऊन त्याचा अहवाल राजापुढे सादर केला. राजालाहि गलिव्हरच्या प्रेमळ स्वभावाची खात्री पटली.

हा पर्वतराव आपल्याला वाटतो तेवढा क्रूर व भयंकर नाही. फार गरीब आणि प्रेमळ आहे. याची लहान मुलांनाहि खात्री पटली त्यांची भीड चेपली. मुले या पर्वतरावाच्या केसातून लपंडाव खेळू लागली. गलिव्हर झोपला असताना एखाद्या डोंगरावर फिरायला जावे तसे त्याच्या शरीरावर लोक फिरत असत.

लिलिपुट राज्यात एक विचित्र पद्धत होती. त्या राज्याच्या सरकारी नोकराना आपली नोकरी टिकविण्यासाठीं तसेच नवीन नोकरी मिळविण्यासाठी एक चमत्कारिक खेळ खेळावा लागत असे.

तो खेळ म्हणजे दोरीवरचा अगर तारेवरचा नाच ! या खेळास जो जास्त चांगलें काम दाखवील त्याला वरची जागा मिळत असे. जो पडेल त्याची नोकरी जात असे.

या खेपेस अशा खेळाचीं व्यवस्था करण्याची जबाबदारी गलिव्हर ऊर्फ पर्वतराव याचेवर आली. गलिव्हरने चार छड्या रोवून त्याला आपला हातरुमाल ताणून बांधला. त्याच्या भोंवती काटयांचे कुंपण तयार केलें.

त्या हातरुमालाचे भव्य असे कापडी मैदान पाहून लिलिपुटचा राजा खूष झाला. त्याने मैदानावर लढाई करण्याचा


हुकूम आपल्या सैन्यास व सरदारास दिला. सैन्यासह सरदार मंडळी आपापले घोडे घेऊन लढाईसाठी तयार होतेच.

गलिव्हरने त्यांच्यापैकी पटाईत असे वीस घोडेस्वार निवडले. त्यांतील एकेकास त्याच्या घोड्यासह अलगत उचलून त्या कापडी मैदानावर ठेवले. गलिव्हरच्या हातरुमालाचे मैदान केवढे असेल बरे ? पण तेवढ्यावरच लिलिपुटच्या सैन्याची लुटुपुटीची लढाई जुंपली. ते एकमेकांवर चढाई करु लागले. पाठलाग करु लागले. हातघाईची लढाई आणि जोरदार हल्ले यानीं हातरुमालाचे कापडी मैदान दुमदुमले.

तो खेळ एवढा जोरदार झाला की खुद्द राजेसाहेबाहि त्या खेळात उतरले. राजेसाहेबांचा खेळ पाहण्याची इच्छा राणीसाहेबांना झाली. मग गलिव्हरने राणीला खुर्चीसह उचलून आपल्या तळहातावर घेतले. तेथून त्यांना तो खेळ चांगला दिसू लागला. राणीसाहेबाहि तो नवा खेळ पाहून खूष झाल्या.

त्या घोडदळातील एका घोड्याची टाप जरा जास्त जोराने पडली. त्याबरोबर त्या रुमालास भोक पडून त्या घोड्याचे खूर त्यात अडकले. मग आपला पर्वतरावाने त्या घोड्याला त्यातून सोडविले. रुमाल अगदी फाटायची वेळ आली तेंव्हा गलिव्हरने लिलिपुटच्या सैन्याची ती लुटुपुटीची लढाई थांबविली.

# अशी तळमळ असे शिक्षण–



ही गोष्ट आहे एक थोर समाजसेवकाची. तळमळीच्या आणि धाडसी समाजसेवकाची. त्यांच्या अंगच्या चिकाटीची. जिद्दीने आपले शिक्षण करण्यासाठी त्याने सोसलेल्या कष्टाची. अडी अडचणीवर आणि संकटावर मात करुन आपले शिक्षण पूर्ण करणाऱ्या या करारी पुरुषाचे नाव गोपाळ गणेश आगरकर !

आगरकरांच्या लहानपणाची एक छोटीशी गोष्ट आहे ही!

ते शाळा शिकत होते तेव्हाची ही घटना आहे. या घटनेमुळेच ते पुढे चिकाटीने शिकले.

आगरकर त्यावेळी अकोल्यास आपल्या मामाकडे शिक्षणासाठी राहिले होते. एकदा त्यांच्या मामी माहेरी गेल्या. त्यामुळे त्यांना घरात बरेच काम पडू लागले. मामा सरकारी नोकरीत असल्याने ते फिरतीवर असत. घरातील कामामुळे अभ्यास उरकून शाळा गाठताना आगरकरांची तारांबळ उडत असे.

घरच्या कामामुळे आगरकरांना एके दिवशी शाळेत जायला थोडासा उशीर झाला. गुरुजी वर्गावर येऊन शिकवू लागले होते. गोपाळ आगरकर हा विद्यार्थी अजून शाळेत आला नाही ही गोष्ट गुरुजींच्या लक्षात आली. वर्गातील मुलांना विचारले,

'गोपाळ कसा आला नाही रे अजून ?'

कुणीच कांही उत्तर दिले नाही. इतक्यात धोतर, सदरा व टोपी असा पोशाख केलेला आणि दप्तर काखेत अडकाविलेला गोपाळ घाईघाईने आला. गुरुजींना वर्गात पाहताच तो दाराशी थबकला आणि म्हणाला,

'गुरुजी, आत येऊ ?'

'ही यायची वेळ आहे का ?'

'माफ करा गुरुजी, थोडा उशीर झाला.'

गोपाळ नम्रपणे म्हणाला. त्यावर गुरुजी म्हणाले,

'म्हणे थोडा उशीर झाला ! काय कारण होतं रे एवढा उशीर करायचं ?'

'घरी काम होतं.'

'या आत.' गुरुजी रागारागाने म्हणाले, 'तुम्ही काय शिकणार ते दिसतंय. तुम्ही असेंच राहणार घरचे काम करीत, ठोंबे कुठले.'

गुरुजींनी गोपाळला टोचून बोललेले त्याला आवडले नाही. तो तेवढ्याच बाणेदारपणे गुरुजींना म्हणाला,

'गुरुजी, तुमच्या सारखा मी सुद्धा एम्. ए. होऊन दाखवीन तरच नावाचा खरा गोपाळ गणेश आगरकर!'

ढगावर ढग आदळल्यावर गडगडाट होतो. आणि चटकन् वीज चमकते. तशी चमक त्या उत्तरात होती. गुरुजींना दिलेले ते तेजस्वी उत्तर आगरकरांनी खरे केले. पण त्यासाठी त्यांना किती त्रास सोसावा लागला, किती कष्ट घ्यावे लागले, त्याला मोजमाप नाही.

गोपाळराव आगरकर कॉलेजात शिक्षण घेण्याच्या विचारात होते. पण त्यांच्या मामांना तो खर्च झेपत नव्हता. कारण गोपाळरावाच्या धाकट्या मामाचा कॉलेज शिक्षणाचा खर्च त्या थोरल्या मामालाच करावा लागत होता. हे पुढचे शिक्षण म्हणजे खर्चाचे.

आगरकरांनी गुरुजींना उत्तर देऊन एम्. ए. परीक्षा पास होण्याची प्रतिज्ञा केली होती. ती प्रतिज्ञा पार पाडण्यासाठी त्यांना कॉलेजात जाणे भाग होते. पण खर्च कसा परवडणार?

त्यांच्या अंगची हुशारी पाहून त्यांच्या याही शिक्षकांना वाटले की एवढा हुशार विद्यार्थी पण केवळ पैशावाचून मागे रहातो आहे त्यानी आपसात वर्गणी करुन आगरकरांना कॉलेजात जाण्यापुरते पैसें दिले.

आगरकर पुण्याच्या डेक्कन कॉलेजमध्ये दाखल झाले. बरी पण पैशाची अडचण कायमच होती. पैसे मिळविण्यासाठी आगरकरांच्या अंगी एक चांगला गुण होता. तो म्हणजे ते चांगले लेखक होते. आणि भाषणेही छान करीत.

डेक्कन कॉलेजात एक निबंध स्पर्धा होती. त्या स्पर्धेत ज्याचा पहिला नंबर येईल त्याला पन्नास रुपयाचें बक्षीस ठेवले होतें. आगरकरानी त्या स्पर्धेत भाग घेतला आणि पहिल्या नंबरचे पन्नास रुपयाचे बक्षीस पटकावले.

तसेच ठिकठिकाणी दणदणीत भाषणे करून त्यांनी बक्षीसे मिळविली.

वर्तमानपत्रात लेख लिहूनही त्यांनी जरुरीपुरते पैसे मिळविले पण शिक्षण थांबविले नाही.

या काळात त्यांच्या अंगावर भरपूर कपडेसुद्धा नव्हते. कॉलेजात सगळी मोठमोठ्या श्रीमंताची मुले असत. भारी किमतीचे व परीटघडीचे कपडे रोज घालून येत. आणि आगरकर?

त्यांना एकच साध्या कापडाचा सदरा होता. तो रोज स्वच्छ तरी असला पाहिजे ना? म्हणून आगरकर रोज रात्री तो सदरा धुवून टाकीत.

एम. ए. च्या परीक्षेच्यावेळी फी भरण्यास पैशाची गरज पडली. कुणाला पैसे मागायचे नाहीत हा त्यांचा बाणा होता. स्वतःला लागणारे पैसे स्वतःच मिळवायचे अशी त्यांची जिद्द होती.

एम्. ए. ची परीक्षा पास होण्याची त्यांची प्रतिज्ञा होती.

ती प्रतिज्ञा पूर्ण होण्याची वेळ अगदी जवळ आली होती. पण केवळ फी च्या पैशावाचून काम आडले होते.

तथापि कोणत्याही परिस्थितीत आडून राहायचे नाही असे त्यांनी ठरविले होते. त्यांनी त्यातूनही मार्ग काढला. एम्. ए. चा अवघड अभ्यास करीत करीत त्यांनी आपली लेखणी चालू ठेवली फीचे पैसे भागविण्यासाठी त्यांनी एक नाटक लिहायला घेतले. ते नाटक लिहिल्यावर त्यांना पैसे मिळणार होते आणि त्यांची गरज भागणार होती.


नाटकाच्या लिखाणासाठी त्यांना जाग्रण होऊ लागले. त्यामुळे त्यांच्या प्रकृतीवर परिणाम होऊ लागला. त्यांच्या कॉलेजात केरूनाना छत्रे या नावाचे एक प्राध्यापक होते. ते आगरकराना गणित शिकवीत होते. त्यांना आगरकरांची अडचण समजली. आणि पैशासाठी ते जाग्रणे करून नाटके लिहित आहेत हेही समजले.

प्राध्यापक छत्रे यांनी त्यांचे फी चे पैसे परस्पर भरले. आगरकरांना त्यांच्याच गुरुजींनी मदत केल्याने अभ्यासास वेळ मिळाला. आणि ते एम. ए. झाले.

एम्. ए. झाल्यावर त्यांनी आईला एक पत्र लिहिले, 'आपला मुलगा एम्. ए. झाला. आता मोठ्या पगाराची नोकरी करील असे तुला वाटत असेल. पण आई! मी या परक्या सरकारची नोकरी करणार नाही. मी समाज सुधारणा करणार आहे.'

आणि आगरकर खरोखरच एक थोर समाजसेवक आणि धडाडीचे समाजसुधारक झाले.

# जशास तसे



एकदा एका कोल्ह्याची आणि करकोच्याची गाठ पडली. करकोच्याची उंच मान आणि निमुळती चोंच पाहून कोल्ह्याला हंसू आले. त्यानं करकोच्याची गंमत करण्याचे ठरविले. कोल्हा त्याला म्हणाला,

'काय दादा कसा काय बेत ?'

'ठीक आहे' करकोच्याने उत्तर दिले.

BVBK-0400797